| | |
|---|---|
| MHST060000432018 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ११/२०१८** |

## निशाणी ४६ वरील आदेश

### (सुशिला शंकर पवार विरूध्द मोहन कोंडिबा गायकवाड व इतर )

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दावा प्रतिवादी क्रमांक ३ हया मयत झाल्यामुळे व त्यांचे कायदेशीर वारस दाव्यात पुर्वीच समाविष्ठ असल्याने प्रतिवादी क्रमांक ३ यांच्या नावापुढे मयत अशी दुरूस्ती होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार प्रस्तूतचा दावा वाटप, कब्जा, जाहीर ठराव व दरम्यानचे उत्पन्न मिळावे यासाठी दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ३ हिराबाई कोंडिबा गायकवाड हया मयत झाल्या आहेत. त्यांनी पुढे असेही कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना दाव्यात पूर्वीच समाविष्ठ केल असून त्यांना दाव्यात वेगळे वारस दाखल करणेचे नसल्याने प्रतिवादी क्रमांक ३ हयांच्या नावापुढे मयत असे नमुद करण्यात यावे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून योग्य ते आदेश पारित करण्यात यावे असे कथन केले आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जात उललेख केल्याप्रमाणे दुरूस्ती करणे न्यायोचित होईल व वादी व प्रतिवादी यांच्यामधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात एकाच वेळी कायदेशीर गुंतागुत न वाढवता निकाली काढणेस न्यायालयास मदत होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

:: **<u>आदेश</u>** ::

१. निशाणी क्रमांक ४६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी १४ दिवसांचे आत प्रस्तावित दुरुस्ती मुळ दाव्यात करुन दुरुस्ती प्रत सादर करावी.

सही/-
(श्रीमती ए. वाय. शेख)
सह दिवाणी न्यायाधीश, क. सतर, न्यायालय
दहिवडी.

दिनांक – ०९/०६/२०२६
ठिकाण – दहिवडी